सन २००८-०९ ते २०१०-११ या कालावधीत महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पासाठी मुख्य लेखाशीर्ष ६४२५ याखाली उपलब्ध झालेल्या अनुदानाचे लेखांकन वर्गीकृत नोंदीद्वारे २४३५ या मुख्य लेखाशीर्षाखाली करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः कृपमं-१११६/प्र.क्र.२१०/२१-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१. शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांकः बासप्र-२००८/प्र.क्र.४५/२१-स, दिनांक ०९.०५.२०११.
२. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प यांचे पत्र क्र.एमएसीपी/पीसीयु/लेखा/लेखाशीर्ष दुरुस्ती/२०१६/१३४५, दि.०८.११.२०१६
३. महालेखाकार कार्यालयाचे पत्र क्र. युओआर-११/२०१७-१८/३३५, दि. २१.०६.२०१७
४. शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांकः पुरक-२०१७/प्र.क्र.४४/१७स दिनांक १९.०८.२०१७
५. महालेखाकार कार्यालयाचे पत्र क्र. युओआर-१२७/२०१७-१८/९१६, दि. १३.०२.२०१८

प्रस्तावना :-

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प जागतिक बँक सहाय्यित प्रकल्प असून, सदर्भ क्र. १ येथील दिनांक ०९.०५.२०११ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे. जागतिक बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम विकास प्रकल्पाच्या उभारणी व अंमलबजावणीसाठी शासन निर्णयान्वये प्रथमतः अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले असून, त्यानंतर शासनाकडून प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी वेळोवेळी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर प्रकल्प आता अंतिम टप्प्यात असून ऑक्टोबर २०१८ अखेर पर्यंत प्रकल्पास मुदतवाढ देण्यात आली आहे.

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पासाठी सन २००८-०९ ते २०१०-११ या कालावधीत मुख्य लेखाशीर्ष ६४२५- सहकारासाठी कर्जे या लेखाशीर्षांतर्गत ५५ - कर्जे व आगाऊ रकमा या तपशीलवार शीर्षामधून राज्य हिस्सा ६४२५०६३६ रु. २८०.०० लाख व बाह्य हिस्सा ६४२५०६८१ रु. १११५.०० लाख असे एकुण रुपये १३९५.०० लाख अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. दरम्यान, जागतिक बँक, भारत सरकार व राज्य शासन यांचेमध्ये दिनांक २०.१२.२०१० रोजी झालेल्या करारानुसार सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग निर्णय क्र.बासप्र -२००८/प्र.क्र.४५/२१स, दिनांक ९.५.२०११ अन्वये सदर प्रकल्पास मान्यता देण्यात आली. तसेच प्रकल्पाचे स्वरुप विचारात घेऊन जागतिक बँकेकडून मिळणारे अर्थसहाय्य (बाहय हिस्सा) व राज्य शासनाकडील हिस्सा यासाठी २४३५-

इतर कृषिविषयक कार्यक्रम हे नवीन स्वतंत्र लेखाशीर्ष उपलब्ध करुन देण्यात आले असून, ३२ - अंशदाने राज्य हिस्सा २४३५००१७ रु. २८०.०० लाख व बाह्य हिस्सा २४३५००२६ रु. १११५.०० लाख असे एकूण रुपये १३९५.०० लाख या मुख्य लेखाशीर्षाखाली करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

जागतीक बँक सहाय्यित महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाकरीता सन २००८-०९ ते २०१०-११ या कालावधीत मुख्य लेखाशीर्ष ६४२५- सहकारासाठी कर्जे यामधून प्रकल्पास उपलब्ध करुन देण्यात आलेले अनुदान हे प्रकल्पाच्या मूळ उद्दिष्टाशी सुसंगत नाही. सदर अनुदानाचे व खर्चाचे लेखांकन प्रकल्पासाठी सध्या अस्तित्वात असलेले मुख्य लेखाशीर्ष २४३५- इतर कृषिविषयक कार्यक्रम या लेखाशीर्षामध्ये होणे आवश्यक आहे. जेणेकरून सदर अनुदानाच्या अनुषंगाने प्रकल्पाच्या खर्चाच्या लेखांकनामध्ये संदिग्धता अथवा कर्ज परतफेडीबाबत प्रश्न उद्भवणार नाही.

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाच्या सन २००८-०९ ते सन २०१०-११ या कालावधीत ६४२५- सहकारासाठी कर्ज या मुख्य लेखाशीर्षाखाली ५५- कर्जे व आगाऊ रकमा या तपशीलवार लेखाशीर्षांतर्गत लेखांकित झालेल्या अनुदानाचे व खर्चाचे वर्गीकरण जुलै, २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात पूरवणी मागणीद्वारे मंजूर झालेला निधी राज्य हिस्सा ६४२५०६३६ रु. २८०.०० लाख व बाह्य हिस्सा ६४२५०६८१ रु. १११५.०० लाख असे एकूण रुपये १३९५.०० लाख प्रकल्पाचे सध्याचे मुख्य लेखाशीर्ष २४३५ - इतर कृषि विषयक कार्यक्रम ३२- अंशदाने राज्य हिस्सा २४३५००१७ रु. २८०.०० लाख व बाह्य हिस्सा २४३५००२६ रु. १११५.०० लाख असे एकूण रुपये १३९५.०० लाख या लेखाशिर्षाखाली वर्गीकृत नोंदीद्वारे (Transfer Entry) पुस्तकी समायोजन करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी **श्री. का.गो. वळवी, उप सचिव,** सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना **नियंत्रण अधिकारी** म्हणून व **श्री. र.गं.बोड्डू, कार्यासन अधिकारी,** सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना **आहरण व संवितरण अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेली राज्य हिस्सा ६४२५०६३६ रु. २८०.०० लाख व बाह्य हिस्सा ६४२५०६८१ रु. १११५.०० लाख असे एकूण रुपये १३९५.०० लाख इतकी रक्कम पुस्तकी समायोनाद्वारे समायोजित करुन प्रकल्पाचे सध्याचे मुख्य लेखाशीर्ष २४३५ - इतर कृषि विषयक कार्यक्रम ३२- अंशदाने राज्य हिस्सा २४३५००१७ रु. २८०.०० लाख व बाह्य्य हिस्सा २४३५००२६ रु. १११५.०० लाख असे एकूण रुपये १३९५.०० लाख (रुपये तेरा कोटी पंच्यान्नव लाख फक्त) इतकी रक्कम या लेखाशिर्षाखाली जमा दाखवावी.

सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने नियोजन विभागाचे अनोपचारिक संदर्भ क्र. २७०/१४३१ दिनांक ०९.०२.२०१७ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १०५/१७/व्यय-२ व अनौसं-२०१/अर्थ-१३ दिनांक ३०.०३.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२२२१६३०४९४२०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Valvi Kalu Gonya

Digitally signed by Valvi Kalu Gonya
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Op,Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, cn=Valvi Kalu Gonya
Date: 2018.02.22 16:37:18 +05'30'

(का. गो. वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा / विधान परिषद, विधान मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा.मंत्री (कृषि / पणन/पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री (कृषि/पणन/पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (कृषि व पणन/ पशुसंवर्धन/वित्त/नियोजन), मंत्रालय, मुंबई
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
६. आयुक्त (पशुसंवर्धन), पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे
८. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे
९. महासंचालक, वनामती, धरमपेठ, नागपूर
१०. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
१२. विभागीय कृषि सहसंचालक, (सर्व)
१३. जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था,(सर्व)
१४. उप-आयुक्त, पशुसंवर्धन, (सर्व)
१५. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,(सर्व)
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१७. निवासी लेखापरीक्षा अधिकारी
१८. अवर सचिव/कक्ष अधिकारी (१७-स/रोखशाखा/२२-स),स.प.व व. विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१९. कक्ष अधिकारी (अर्थसं.१३/व्यय-२),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०. ०३२.
२०. निवडनस्ती (२१-स).